| MHOS090026842017 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | :- | २१/०९/२०१७ | | |
| | नोंदणी दिनांक | :- | २१/०९/२०१७ | | |
| | निकाल दिनांक | :- | ०६/०७/२०२६ | | |
| | कालावधी | :- | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०८ | ०६ | १५ |

**भाग अ**

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, (कोर्ट नं.२) कळंब, ता. कळंब,**

**जि. धाराशिव (उस्मानाबाद) यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी - एन. एम. रेड्डी)

**नियमित फौजदारी खटला क्र.१४१/२०१७** **निशाणी क्र.**

**कळंब पोलीस स्टेशन गु.र.क्र. ६८/२०१२**

| | | |
|---|---|---|
| अभियोग पक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत - पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे, कळंब, ता.कळंब,<br>जिल्हा उस्मानाबाद. |
| अभियोग पक्षातर्फे सुविद्य<br>सहा.स.अभियोक्ता. | | श्री. अयाजोद्दीन रियाजोद्दीन. |
| | **विरुध्द** | |
| आरोपी पक्ष | | १. अजित चंद्रकांत बाभळे,<br>वय ३६ वर्षे, धंदा- नोकरी,<br>रा.दत्तनगर, कळंब,<br>ता.कळंब, जि.धाराशिव<br>२. मिनाक्षी विनायकराव लोकरे,<br>वय ५२ वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा.खेर्डा,<br>ता.कळंब, जि.धाराशिव |
| आरोपी क्र. १ तर्फे विधिज्ञ | | श्री. पी.एस. यादव |

| | | |
|---|---|---|
| आरोपी क्र. २ तर्फे विधिज्ञ | | श्री. बी.एस. पवार |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २८/०२/२००९ ते ०१/०६/२०११ |
| गुन्हा दाखल दिनांक | २१/०९/२०१७ |
| दोषारोप दाखल दिनांक | ३१/०३/२०१२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | २१/०९/२०१७ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २१/०१/२०२३ |
| न्यायनिर्णयास ठेवल्याचा दिनांक | ०६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०६/०७/२०२६ |
| दोषी ठरवल्याचा दिनांक, जर असल्यास | -- |

**आरोपीची सविस्तर माहिती**

| अ.क्र. | आरोपीचे नांव | अटक केल्याचा दिनांक | जामीन वर सोडल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा दिली असल्यास किती | न्यायालयीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | अजीत चंद्रकांत बाभळे | २२/०४/१२ | २२/०४/१२ | भा.द.वि. चे कलम ४०९ सह ३४ प्रमाणे | निर्दोष. | -- | -- |
| २) | मिनाक्षी विनायकराव लोकरे | | | | | | |

**भाग क**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार/ आरोपीतर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार यांची यादी**

**अ. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १. | बळीराम दगडू ढवळे | फिर्याद | ६८ |
| २. | सुरेश संभाजी भंडारे | पंच घटनास्थळ | ८३ |
| ३. | नंदकिशोर रामराव दुरुगकर | साक्षीदार | ८५ |
| ४. | सुजीत पोपटराव गरड | साक्षीदार | ८७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | शिरीष सज्जनराव देशमुख | जप्ती पंच | ९५ |
| ६. | मारुती निवृत्ती शेळके | तपासीक अंमलदार | १०९ |

**ब. आरोपीतर्फे साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन साक्षीदार**

| साक्षीदार क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**अभियोग पक्ष/आरोपी/न्यायालयीन पुराव्यांची यादी**

**अ. अभियोग पक्षाचा पुरावा**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १ | अ.सा.क्र.१/६९ | फिर्याद. |
| २ | अ.सा.क्र.५/९६ | जप्ती पंचनामा. |
| ३ | अ.सा.क्र.६/११० | फिर्यादवरील सहीस. |
| ४ | अ.सा.क्र.६/१११ | घटनास्थळ पंचनामा. |
| ५. | अ.सा.क्र.६/११२ व ११३ | अटक पंचनामे. |

**ब. आरोपीतर्फे पुरावा**

| निशाणी क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालयीन पुरावा**

| निशाणी क्रमांक | नांव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | |

**ड. मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१. | एमआर नं. ३७/२२ | फॉर्म नं. ५२ एम.बी. रजि.क्र. ८२६३. |
| ०२. | एमआर नं. ३७/२२ | सर्व शिक्षा अभियान जमा खर्च किर्द. |

| | | |
|---|---|---|
| ०३ | एमआर नं. ३७/२२ | जि.प. अहिल्या वस्ती शाळा, खेर्डा येथील बांधकामाचे प्रमाणक. |
| ०४ | एमआर नं. ३७/२२ | जि.प. अहिल्या वस्ती शाळा, खेर्डा येथील बांधकामाचे तांत्रीक मजूरचे आदेश, बांधकामाचे अंदाजपत्रक व बांधकामाचे नकाशे. |
| ०५ | एमआर नं. ३७/२२ | एक मराठवाडा ग्रामीण बँक शाखा, मोहा येथील संयुक्त खात्याचे पासबूक क्र.३३१३. |
| ०६ | एमआर नं. ३७/२२ | एक महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा, मोहा येथील संयुक्त खात्याचे पासबूक क्र.२२०००५१ मधील नोंद |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ०६ जुलै, २०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० (यानंतर संक्षिप्तपणे **'भा.दं.वि.'** असे संबोधण्यात येत आहे) चे कलम ४०९ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत संपरीक्षा चालविण्यात आली आहे.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे कीः-**

**२.** बळीराम दगडु ढवळे (येथुन पुढे '**फिर्यादी**' संबोधण्यात येईल) यांनी कळंब पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली की, आरोपी क्र.१ हे दि.०१/०६/२०११ रोजीपर्यंत जिल्हा परिषद शाळा खेर्डा येथे नेमणुकीस होते.

**३.** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहिल्यावस्ती खेर्डा, ता.कळंब येथे दोन खोलीचे बांधकाम मुलांमुलीकरीता स्वतंत्र स्वच्छता गृह, किचन, शेड बांधकाम, पिण्याच्या पाण्याची सोय, विद्युतीकरण व चाईल्ड फ्रेंडली एलीमेंन्ट या बांधकामासाठी शासनाकडुन रक्कम ६,५२,५००/- रु. ची मंजूरी दिली होती. सदरचे बांधकाम आरोपी क्र. १ व २ यांना शासनाने ठरवुन दिलेल्या अटी व नियमाप्रमाणे करणेबाबत बॉन्डपेपरवर शासनासोबत करारनामा केला होता. आरोपी क्र. १ व २ यांना बांधकाम पूर्ण करण्यासाठी रक्कम ६,५२,५००/- पैकी

७५ टक्के प्रमाणे ४,८९,३७५/- रु. दि.२८/०२/२००९ रोजी दुसरा हप्ता २० टक्के प्रमाणे १,३०,५००/- रु. दि.०९/०६/२०१० रोजी दिले. एकूण ९५ टक्के ६,१९,८७५ रु. एवढी रक्कम आरोपी क्र. १ व २ यांना चेक द्वारे दिली होती. बांधकाम पूर्ण न झालेबाबत व भ्रष्टाचारबाबत तक्रारी अर्ज आल्याने त्यांच्या चौकशीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. उस्मानाबाद यांनी त्रीसदस्यीय समिती नेमली होती. त्या चौकशी समितीने अहवाल दिला की, शासनाने ठरवुन दिलेले काम पूर्ण न करता मोजमाप पुस्तिका क्र.८२६३ प्रमाणे केवळ रक्कम रु.४,१५,०००/- चे बांधकाम केले, महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा, मोहा खाते क्र. २२०००५१ या खात्यावर रक्कम रु.६४,१४४/- जमा आहेत. तसेच रक्कम रु.२७,८५०/- चे विकत घेतलेले साहित्य शिल्ल्क आहे. अशा प्रकारे आरोपी क्र.१ व २ यांनी शासनाकडुन कामाकरीता भेटलेले पैसे ६,१९,८७५/- रक्कमेपैकी ५,०६,९९४/- एवढे बांधकामासाठी, शिल्लक साहित्य व बँक खात्यावर जमा रक्कम व उर्वरीत १,१२,८८१/- रकमेचा अपहार केल्याचे दिसुन आले. आरोपी क्र.१ व २ यांनी करारनाम्याप्रमाणे काम न केल्यामुळे व शासनाच्या रकमेचा उपहार केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे आरोपीविरुध्द त्यांनी वरील आशयाची फिर्याद दाखल केली.

**४.** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४०९ सह ३४ अन्वये गुन्हा क्र. ४१/२०१२ पोलीस ठाणे कळंब येथे नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास श्री. एम.एन. शेळके पो.उपनि. पो.स्टे. कळंब यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला. तसेच, जप्ती पंचनामा तयार करुन घटनेशी संबंधीत असलेल्या साक्षीदारांचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १६१ प्रमाणे जबाब नोंदविले. आरोपींविरुध्द पुरावा मिळून आल्यामुळे त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप-पत्र सादर केले.

**५.** माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी निशाणी क्रमांक ५२

अन्वये आरोपींविरुध्द भा.दं.वि. चे कलम ४०९ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधाबाबत दोषारोप निश्चित केला. उक्त दोषारोप आरोपींना वाचून व समजावून सांगितला असता, त्यांनी तो अमान्य असल्याचे सांगून संपरीक्षेची मागणी केली.

**६.** आरोपीविरुध्दचे आरोप सिध्द करणेकामी अभियोग पक्षातर्फे एकुण सहा साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. त्यानंतर सरकारी वकिलांच्या तोंडी विनंतीवरुन अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी क्रमांक १ खाली आदेश पारीत करुन बंद करण्यात आला. आरोपींविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ (१) (बी) प्रमाणेचे निवेदन निशाणी क्रमांक ११४ व ११५ वरती नोंदवण्यात आले.

**७.** मी अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. अयाजोद्दीन रियाजोद्दीन व आरोपीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निर्माण होतात. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे सिध्द केले आहे काय की, आरोपींनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अहिल्यावस्ती खेर्डा येथील शासनासोबत करारनामा केलेल्या पैशापैकी १,१२,८८१ रु. चा अपहार केल्याचे सिध्द केले काय ? | नकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबतः</u>-**

**८.** आरोपीविरुध्द भा. दं. वि. कलम ४०९ सह ३४ प्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहे. सदर दोषारोप वाजवी संशयापलिकडे जाउन सिध्द करण्याची जबाबादारी ही अभियोगपक्षाचीच आहे.

९. दोन्ही बाजुचा युक्तीवाद मी काळजीपूर्वक ग्रहण केला. अभिलेखावरील कागदपत्रे व पुराव्याचे मी बारकाईने अवलोकन केले.

**<u>साक्षीदार क्र.१ फिर्यादी</u>**

१०. फिर्यादी सा.क्र. १ बळीराम यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सन २०१२ रोजी कळंब मध्ये ते प्रभारी गटशिक्षण अधिकारी म्हणून गटसाधन केंद्र, कळंब येथे कार्यरत होते. दि. २८.०३.२०१२ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी पत्र क्र.१३२/२०१२ त्यांना पाठविले. खेर्डा येथील अहिल्या वस्ती भागातील शाळेच्या दोन खोल्यांची बांधकाम पुर्ण न करता रक्कमेचा अपहार केला म्हणून गुन्हा नोंद करणेसंबधी सदर पत्र होते. मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सर्व शिक्षा अभियानामध्ये दोन वर्ग खोल्या, मुला-मुलींसाठी स्वच्छता गृह, पिण्याचे पाणी, विद्युतीकरण व चाईल्ड फ्रेंडली यासाठी रक्कम रुपये ६,५२,५००/- मंजुर केले होते. सदरचे काम शाळेचे मुख्याध्यापक अजित बाभळे व ग्रामशिक्षण समीतीचे अध्यक्ष करीत होते. रक्कम मंजूर झाल्यानंतर अजित बाभळे व ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष यांच्याकडून करार करुन घेतला होता. त्यांना दोन टप्प्यात रक्कम दिली होती. पहिल्या टप्प्यात दि. २८.०२.२००९ रोजी ७५ टक्के रक्कम व दुस-या टप्प्यात दि. ०९.०६.२०१० रोजी २० टक्के रक्कम असे एकुण रक्कम रुपये ६,१९,८७५/- त्यांना दिली होती. त्यानंतर बांधकाम पुर्ण झाले नाही म्हणून मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रारी झाल्या. त्यांनी सर्वशिक्षण अभियानाचे कार्यकारी अभियंता शिरीष कुडल, सदर कार्यालयातील सुजीत गरड, त्यानंतर नंदकिशोर दुरुगकर, कनिष्ठ अभियंता, गटसाधन केंद्र, कळंब यांची चौकशी समिती नेमली. सदर समितीने चौकशी करुन झालेल्या बांधकामाचे मोजमाप करुन किती पैसे खर्च झाले त्याचा अहवाल मुख्यकार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविला. सदर अहवालावरुन रक्कम रु.६,१९,८७५/- पैकी, रक्कम रु.५,६९९४/- एवढी रक्कम बांधकामासाठी वापरली व रक्कम रु.१,१२,८८१/- एवढया रक्कमेचा अपहार झाला असा अहवाल दाखल केला. सदर अहवालावरुन

त्यांनी गुन्हा दाखल केला. त्यांना सदर फिर्याद दाखविण्यात आली. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर त्यांची सही आहे असे त्यांनी कथन केले आहे.

**११.** आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, गटशिक्षण अधिकारी म्हणुन दिनांक ०३/०१/२०१२ तसे एप्रिल २०१२ पर्यंत कार्यरत होते. त्यांच्याकडे तात्पुरता कार्यभार होता. गटशिक्षण कार्यालया अंतर्गत प्रशासकिय मंजुरी देणे, अंदाजपत्रक तयार करणे, कार्यारंभ देणे इत्यादी कामे नाहीत. काम पुर्ण करुन घेण्याबाबतचा करार सर्व शिक्षण अभियानाचे अभियंता व शाळेचे मुख्याध्यापक यांच्यामध्ये झाला होता. करारााचे पैसे गटशिक्षण अधिकारी यांनी चेकद्वारे दिले होते. सदर करारामध्ये काम सहा महिन्यामध्ये पुर्ण करावयाचे होते. करार झाल्यानंतर किती दिवसांनी रक्कम जमा केली हे त्यांना सांगता येणार नाही. दिनांक २९/०३/२००८ रोजी करार झाला. दिनांक २८/०२/२००९ रोजी पहिल्या टप्प्यातील रक्कम चेकद्वारे दिली.

**१२.** त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, शाळेच्या बांधकामाचे अंदाजपत्रक अभियंता तयार करतो. अभियंता सदर अंदाजपत्रक त्या-त्या वर्षीच्या डी.एस.आर. दराप्रमाणे करतो. डी.एस.आर. दर दरवर्षी बदलतो. ग्रामशिक्षण अधिकारी व मुख्याध्यापक यांच्यामधील कराराचा भंग झाला किंवा कसे हे त्यांना सांगतायेणार नाही. त्यांनी तत्कालीक गटशिक्षण अधिकारी असल्याने मुख्याधिकारी यांच्या सांगण्यावरुन त्यांनी फिर्यादी दिली होती. त्यांना घटनेविषयी वैयक्तीक माहीती नाही. बॅकेमध्ये किती रक्कम जमा झाली तसेच मोजमाप पुस्तीका कोणी केली, कशी केली याबाबत त्यांना वैयक्तीकरित्या माहीती नाही. करार त्यांनी प्रत्यक्ष पाहिला नाही व त्यातील अटी शर्ती त्यांना वैयक्तीकरित्या मान्य नाहीत.

**१३.** त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांच्या कालावधीमध्ये किंवा त्यांच्या अगोदर अपु-या बांधकामाबाबत त्यांच्या कार्यालयाला कोणतीही तक्रार आलेली नाही. कराराप्रमाणे सहा महिन्यात काम पुर्ण करावयाचे असताना आगाऊ

रक्कम ११ महिन्यानंतर देण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी कशाप्रमाणे मुल्यमापन केले हे त्यांना माहिती नाही. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

**१४.** आरोपी क्र.२ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, दिनांक १७/०६/२०१० रोजी शासनाच्या वतीने बालकांच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ आला. दिनांक १७/०६/२०१० पुर्वी मुख्याध्यापक सचिव होते व त्या-त्या गावचे सरपंच शाळेचे अध्यक्ष होते. २००९ च्या अधिनियमाप्रमाणे शाळेच्या विद्यार्थांच्या पाल्यापैकी एकाला अध्यक्ष केले जायचे. दिनांक ३०/१२/२०१० रोजी शाळेच्या अध्यक्षांचे पद खारीत करण्यात आले किंवा कसे याबाबत त्यांना माहिती नाही. दिनांक २४/०६/२०११ रोजी आरोपी क्र.१ यांनी गट शिक्षण अधिकारी, कळंब यांच्याकडे अर्ज सादर करुन काम जमणार नसुन ते काढुन घेण्याबाबत कळविले होते, याबाबत त्यांना माहीती नाही. दिनांक १४/०९/२०११ व दिनांक १९/१२/२०११ रोजी आरोपी क्र.१ यांनी गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे झालेल्या कामाचे मुल्यमापन करुन एल.पी.सी. देण्याबाबत अर्ज केला याबाबत त्यांना माहीती नाही. दिनांक २५/०३/२०१२ रोजी आरोपी क्र.१ ने त्यांच्याकडे काम काढुन घेणेबाबत सादर केलेला अर्ज त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठविला. आरोपीविरुध्द तक्रार कोणी दिली याची त्यांना माहीती नाही. वरिष्ठ कार्यालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली आहे. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

**१५.** सदरचे साक्षीदार हे फिर्यादी असुन निशाणी क्रमांक ६९ वरील फिर्याद त्यांनी सिध्द केली आहे. फिर्यादीच्या कथनाप्रमाणे आरोपी अजित व ग्रामशिक्षण समितीचे अध्यक्ष यांच्याकडुन सर्व शिक्षण अभियाना अंतर्गत करार करुन घेतला होता. त्या करारान्वये दिनांक २८/०२/२००९ व ०९/०६/२०१० रोजी अनुक्रमे ७५ टक्के व २० टक्के रक्कम खात्यामध्ये वर्ग झाली होती.

अभिलेखाचे अवलोकन केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी व आरोपी यांच्यामध्ये झालेल्या तथाकथित कराराचा मुळ दस्त किंवा प्रमाणीत दस्त अभियोग पक्षाने अभिलेखावर सादर करुन सिध्द केलेला नाही. तसेच, आरोपीच्या किंवा शाळेच्या खात्यामध्ये एकुण ६,२१,७७५/- रुपये वर्ग केले या संदर्भात देखील कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर अभियोग पक्षातर्फे दाखल केलेला नाही. सबब, सदरच्या साक्षीदाराची साक्ष ही केवळ त्याने फिर्याद दाखल केली या हद्दीपुरतीच अभियोग पक्षास उपयुक्त ठरेल. केवळ, सदरच्या साक्षीदाराच्या साक्षीवर विश्वास ठेवता येणार नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या इतर साक्षीदारांची साक्ष देखील विचारात घेणे महत्वाचे ठरेल.

<u>घटनास्थळ पंच</u>

**१६.** सा.क्र. २ सुरेश यांच्या साक्षीत असे आले आहे की, त्यांचे शिक्षण इयत्ता दहावीपर्यंत झाले. दिनांक ०१.०४.२०१२ रोजी ते कोठे होते हे त्यांना आठवत नाही. त्यांचे समक्ष पंचनामा झाला किंवा कसे त्यांना आठवत नाही. त्यामुळे, सदरच्या साक्षीदाराची साक्ष ही अभिलेखावरील पंचनामा सिध्द करण्यास उपयुक्त ठरणार नाही.

<u>साक्षीदार</u>

**१७.** सा.क्र. ३ नंदकिशोर यांच्या साक्षीत असे आले आहे की, सन २०१२ मध्ये कनिष्ठ अभियंता म्हणून ते गटशिक्षण कार्यालय, कळंब येथे कार्यरत होते. त्यावेळेस जिल्हा परिषदेमार्फत सर्व शिक्षा अभियान चालु होते. सदर अभियाना अंतर्गत अहिल्याबाई वस्ती, खेर्डा येथील शाळेसाठी दोन खोल्या मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक म्हणून आरोपी अजित बाभळे होते व शाळा समितीचे अध्यक्ष आरोपी क्र.२ लोकरे होते. ग्रामशिक्षण समितीचे प्रतिनिधी म्हणून आरोपी क्र.१ व २ तसेच जिल्हा परिषदेचे प्रतिनिधी म्हणून गटशिक्षणाधिकारी यांचेमध्ये बांधकामाबात शंभर रुपयाचे स्टॅम्प पेपरवर

करारनामा झाला होता. सदर बांधकामाचे अंदाजपत्रकीय मुल्य रक्कम रु.६,५२,०००/- रुपये होते. करारनाम्यावर शाळा समितीचे अध्यक्ष व सचिव म्हणून मुख्याध्यापक यांच्या सहया होत्या. करारनाम्यामध्ये आरोपी क्र.१ व २ यांना तीन टप्यामध्ये दयायचे रक्कमेबाबत नमुद केलेले होते. अग्रीम पहिला टप्पा मिळून एकूण रक्कम रु.६,१९,८७५/- रुपये आरोपी क्र.१ व २ यांना देण्यात आली होती. करारनाम्यानुसार सहा महिन्यामध्ये बांधकाम पुर्ण करावयाचे होते.

**१८.** ते, जिल्हा परिषद अभियंता गरड, कार्यकारी अभियंता कुडळ यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे आदेशाने त्यांना सदर बांधकामाबाबत चौकशी केली. आम्ही घटनास्थळावर जावून बांधकामाचे मुल्यांकन केले. तेथे दोन खोल्यांचे बांधकाम पुर्ण झाले होते. स्वयंपाकगृह अर्धवट राहिले होते व बांधकामाचे साहित्य तेथे पडलेले होते. आम्ही बांधकामाचे मुल्यांकन केले ते कमी झाले होते. त्याबाबतचा अहवाल आम्ही मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना पाठविला. सुमारे रक्कम रु.१,१२,८८१/- रुपयांचा फरक दिसून आला. त्यानंतर आरोपींचे बँक खात्याची चौकशी केली असता सदर खात्यामध्ये रक्कम शिल्लक नव्हती. बांधकामाचे मुल्यांकन कमी झालेले होते तसेच आरोपींचे बँक खात्यामध्ये रक्कम शिल्लक नव्हती त्यामुळे अफरातफर झाल्याचे दिसून आले. त्याबाबत आम्ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे अहवाल पाठविला. आरोपी क्र.१ शाळेचे मुख्याध्यापक यांना ते ओळखतो. ते आज न्यायालयात हजर आहेत. आता मला मुल्यांकन रजिस्टर दाखविण्यात आले ते तेच आहे. त्यास वस्तु अ देण्यात येते. सदर मुल्यांकनाप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

**१९.** आरोपी क्र.१ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत शाळेचे बांधकाम व इतर पायाभुत सुविधांची जबाबदारी ग्रामशिक्षण समितीकडे होती. मुख्याध्यापक हे ग्रामशिक्षण समितीचे सचिव व सरपंच हे अध्यक्ष असतात. सदर समिती अकरा सदस्यांची असते. सदर समितीमध्ये विद्यार्थ्यांचे पालक, ग्रामपंचायत सदस्य व

इतर शिक्षणप्रेमी यांचा समावेश असतो. बांधकामाबातचा करार हा ग्रामशिक्षण समितीच्या वतीने स्वाक्षरीत करण्यात आलेला होता. बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता बांधकामाला लागणा-या साहित्याचे दरपत्रक तयार केले जाते. त्या आर्थिक वर्षातील दरपत्रकाप्रमाणे अंदाजपत्रक तयार केल्यानंतर त्याला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरच करार करण्यात आला होता.

२०. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, दरपत्रक दरवर्षी चार ते पाच टक्क्यांनी वाढते. करारनामा हा सन २००८ साली झाला व मुल्यांकन सन २०१२ मध्ये केले होते. शिक्षण समितीचे कामकाज करताना मुख्याध्यापकांनी त्यांचे कर्तव्य पार पाडुन उव्ररीत वेळात शिक्षण समितीचे कामकाज करणे अपेक्षीत आहे. मोजमाप पुस्तीकेमधील नोंदीकरणे हे अभियंता म्हणुन त्यांचे काम आहे.

२१. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, करारनाम्यामध्ये सहा महिन्यात काम पुर्ण करणेबाबत नमुद होते, परंतु प्रत्यक्ष पहिल्या हफ्त्याची रक्कम करारनाम्यानंतर वर्षभरानंतर देण्यात आली. कवेळ करारनामा केलेला आहे म्हणुन शासनाने रक्कम दिलेली नसताना स्वत:च्या खर्चाने बांधकाम सुरु करावे असा नियम नाही व तसे अपेक्षीत नाही. सन २०११ मध्ये आरोपी क्र.१ यांची बदली झाली होती किंवा कसे हे त्यांना सांगता येणार नाही. बदली झाल्यानंतर नवीन मुख्याध्यापक जुन्या दरपत्रकाप्रमाणे अपुर्ण कामकाज पुर्ण करता येणार नाही, त्यामुळे आर्थिक पदभार घेण्यास टाळाटाळ करतात.

२२. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, त्यांना अंदाजपत्रकाच्या बाहेर जाऊन मुल्यांकन करता येत नाही. बांधकामाचे वाढलेले दर गृहीत न धरता अंदाजपत्रकाप्रमाणे दर गृहीत धरावे लागतात. त्यांनी केवळ फरकाची रक्कम अहवालामध्ये नमुद केली व सदर रक्कमे आधारे वसुलपात्र रक्कम दाखविली. अंदाजपत्रकाप्रमाणे किती कामकाज झाले आहे व अंदाजपत्रकाप्रमाणे किती रक्कम शिल्लक आहे हेच ग्राह्य धरले जाते. सन २००७-२००८ चे दरपत्रकाप्रमाणे सन २०१२ चे मुल्यांकन केले असल्याने बांधकामचे वाढलेल्या दरामुळे सदर फरक

निघु शकतो. मुल्यांकन रजिस्टर वस्तु अ मध्ये दाखविलेले मुल्यांकन हे सन २००७-०८ चे दरपत्रकाप्रमाणे दाखविले आहे. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत. आरोपी क्र.२ तर्फे आरोपी क्र.१ यांनी घेतलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

२३. सदरच्या साक्षीदाराच्या साक्षीमध्ये करारनामा, मुल्यांकन रजिस्टर या दस्तांबद्दल साक्षीदाराने ऊहापोह केला आहे. परंतु, ते दस्त अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले नाहीत. त्यामुळे, सदरच्या साक्षीदाराची साक्ष ही केवळ तोंडी स्वरुपाची आहे. सबब, सबळ कागदोपत्री पुराव्याअभावी सदरच्या साक्षीदाराची साक्ष विचारात घेता येणार नाही. तसेच, वस्तु अ वरील मुल्यांकन रजिस्टरमधील मजकुर देखील सिध्द न झाल्यामुळे तो वाचता येणार नाही. सबब, वस्तु अ वरील पुरावा देखील अभियोग पक्षास उपयुक्त ठरलेला नाही.

<u>साक्षीदार</u>

२४. सा.क्र. ४ सुजित यांच्या साक्षीत असे आले आहे की, ते सन २००३ पासुन जिल्हा परिषद धाराशिव येथे सर्व शिक्षा अभियान, कनिष्ठ अभियंता पदावर कार्यरत होते. दिनांक १०/०३/२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धाराशिव यांच्याकडे राजा राऊत मु.पो. आंबेवाडी यांच्याकडुन अहिल्यावस्ती खेर्डा येथील वस्ती शाळेचे बांधकाम अपुर्ण आहे अशी तक्रार आली होती व सदर बांधकामामध्ये अपहार झालेला आहे अशी तक्रार होती.

२५. सदर तक्रारीवरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता कुंडळ, ते स्वत: व दुरुगकर, क. अभियंता यांनी जायमोक्यावर जाऊन पाहणी करुन चौकशी करावी असे तोडी आदेश दिले होते. सदर आदेशानुसार ते मार्च २०१२ मध्ये प्रत्यक्ष जायमोक्यावर गेले. तेथे शाळेचे मुख्याध्यापक अजित बाभळे हजर होते. ग्राम शिक्षण समितीच्या अध्यक्षा मिनाक्षी लोकरे तेथे हजर होत्या. सदर शाळेच्या बांधकामाचे काम ग्राम शिक्षण समिती, अध्यक्ष सरपंच व सचिव मुख्याध्यापक यांना दिले होते. त्याबाबत शंभर रुपयांच्या बॉड पेपरवर

करारनामा झाला होता. त्यामध्ये दोन खोल्याचे बांधकाम, मुलामुलींचे स्वच्छतागृह, किचन शेड बांधकाम, लाईट फिटींग पाणीपुरवठा सुविधा, मुलांसाठी घसरगुंडी बांधकाम इत्यादी कामाकरीता ६,५२,५००/- रुपये मुजुर करण्यात आले होते. त्यापैकी करारनाम्यातील रक्कमेपैकी ७५ टक्के अग्रीम रक्कम रुपये ४,८९,३७५/- देण्यात आली होती. २० टक्के रक्कम १,३०,५००/- जुन २०१० मध्ये वितरीत केली होती. असे एकुण ९५ टक्के रक्कम ६,१९,८७५/- रुपये ग्राम शिक्षण समितीच्या खात्यावर जमा करण्यात आले होते. रक्कम वितरीत केल्यानंतर सहा महिन्यात बांधकाम पुर्ण करणे अपेक्षीत होते. त्यांनी मार्च २०१० मध्ये जायमोक्यावर जावुन पाहणी केली असता, तेथे दोन खोल्यांचे बांधकाम पुर्ण झाले होते. तसेच, तेथे फरशी, वाळु, विटा इत्यादी बांधकामाचे साहित्य होते. कनिष्ठ अभियंता यांनी सदर बांधकामोच मोजमाप पुस्तीकेनुसार मुल्यांकन केले. दोन खोल्यांचे मुल्यांकन ४,१५,०००/- रुपये झाले. ग्रामशिक्षण समितीच्या खात्याचे पासबुक तपासले असता त्यामध्ये ६४,१४४/- रुपये शिल्लक होते. जायमोक्यावर पडलेल्या बांधकामाच्या साहित्याचे मुल्यांकन २७,८५०/- रुपये इतके होते. सदर ६,१९,०००/- मधुन ५,०६,९९४/- रुपये वगळता १,१२,१४४/- रुपयांचा अपहार झाल्याचे दिसुन आले. तसा अहवाल त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला. ग्रमाशिक्षण समिती अध्यक्ष व सचिव यांना बांधकाम पुर्ण करण्याची पुरेशी संधी देवुन देखील त्यांनी बांधकाम पुर्ण केले नाही. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अध्यक्ष व सचिव यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यासाठी गट शिक्षण अधिकारी, श्री. ढवळे यांना आदेश दिले.

२६. आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, ते सन २००३ पासुन कनिष्ठ अभियंता म्हणुन कार्यरत आहेत. प्रस्तुत प्रकरणात पोलीसांनी त्यांचा जबाब मार्च २०१२ मध्ये नोंदविला होता. ते चौकशी करण्यासाठी जायमोक्यावर गेले असता तेथे ग्रामशिक्षण समितीच्या सदस्यांना बोलाविले नव्हते. ते जायमोक्यावर पाहणी करण्यासाठी जात असलेबाबत कोणालाही लेखी सुचना दिलेल्या नव्हत्या.

२७. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, आरोपी क्र.१ मुख्याध्यापक म्हणुन कोणत्या कालावधीपासुन कोणत्या कालावधीपर्यंत होता याची चौकशी त्यांनी केली नाही. आरोपी क्र.२ सरपंच कोणत्या कालावधीपासुन कोणत्या कालावधीपर्यंत अध्यक्ष म्हणुन कार्यरत होत्या याची चौकशी केली नाही. ग्रामशिक्षण समितीच्या खात्यामध्ये सहीचे नमुने केव्हा बदलले याबाबत त्यांनी चौकशी केली नाही. कार्यरत नमुने कोणते होते याबाबत त्यांनी त्यावेळी चौकशी केली नाही.

२८. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, बांधकामाबाबत त्यांच्यासमक्ष करारनामा झालेला नाही. तो करारनामा त्यांनी पाहिला होता. सदर करारनामा गट शिक्षण अधिकारी यांच्याकडे उपलब्ध करुन घेतला व त्यांनी पाहिला होता. करारनामा लिहुन देणार म्हणुन आरोपी क्र.१ ग्रामशिक्षण समिती सविच व आरोपी क्र.२ अध्यक्ष ग्रामशिक्षण समिती व लिहुन घेणार मुख्य कार्यकारी अधिकरी यांच्यावतीने गट शिक्षणाधिकारी असे होते. सदर करारनामा सन २००८ मध्ये झाला.

२९. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, शासकीय कामाचे स्वरुपामध्ये अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मान्यता घेणे त्यानंतर प्रशासकीय मान्यता घेणे व त्यानंतर करारनामा करणे असे तीन टप्पे असतात. त्यासाठी सुमारे दोन तीन महिन्याचा कालावधी जातो. करारनाम्यामध्ये ग्राम शिक्षण समितीचे खात्यावर रक्कम वर्ग केल्यानंतर सहा महिन्यात बांधकाम पुर्ण करावे असे नमुद केले होते. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरमयान आर्टीकल ४ वरील मुळ करारनामा निशाणी क्रमांक ८८ ओळखला.

३०. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, शाळेच्या कामकाजामध्ये गावातील लोकांचा सहभाग असावा म्हणुन ग्रामशिक्षण समितीची स्थापना झाली आहे. सदर समितीच्या माध्यमातुन बरेच वेळा लोकवटा गोळा करुन कामे केली जातात. शाळेची किरकोळ कामे लोकांच्या सहभागातुन पुर्ण करणे अपेक्षीत आहे.

करारनाम्यासाठी संपुर्ण राज्यासाठी एकच मजकुर वापरला जातो.

३१. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, जायमोक्यावर जावुन पाहणी करुन त्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल दिल्यानंतर सदर प्रकरणाशी आमचा काही संबंध राहिला नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करा असे त्यांना सांगिततले नव्हते. पोलीसांना जबाब देतेवेळी त्यांनी असे सांगितले होते की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आरोपींना बांधकाम पुर्ण करण्यासाठी मुदत दिली, परंतु त्यांनी मुदतीत बांधकाम पुर्ण केले नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले. सदर मजकुर त्यांच्या जबाबात नमुद नाही. त्याचे कारण ते सांगु शकत नाहीत. ते त्यांच्या अख्त्यारीत येत नाही.

३२. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, सदर प्रकरणातील संचिकेस २००७-२००८ या आर्थिक वर्षांतील तांत्रिक मान्यता आहे किंवा असे हे त्यांना सांगात येणार नाही. बांधकाम साहित्याचे दर प्रत्येक आर्थिक वर्षाला बदलतात. बांधकाम साहित्याचे दर प्रत्येक आर्थिक वर्षाला वाढतात. जायमोक्यावरील बांधकामाचे मुल्यांकन ते अंदाजपत्रकावरुन करतात. जायमोक्यावरील बांधकाम साहित्यापैकी मोजता येणारे साहित्य त्यांनी मोजले आहे व वाळु, खडी इत्यादी अंदाजे ठरविले आहे. जायमोक्यावर त्यांनी प्रत्यक्ष बांधकामापेक्षा कमी मुल्यांकन केले हे त्यांना सांगता येणार नाही. सदर बाब त्यांच्या अख्त्यारीत येत नाही. बांधकामासाठी दिलेली रक्कम, बँकेत शिल्लक रक्कम तसेच, बांधकामाचे मुल्यांकन व उरतलेलया साहित्याचे मुल्यांकन यांची बेरीज वजाबाकी करुन त्यांनी फरक काढला. ग्रामशिक्षण समितीमध्ये कोण कोण सदस्य आहेत याची त्यांनी चौकशी केली नाही. जायमोक्यावर देखरेख अभियंता म्हणुन बांधकामाचे सुरुवातीपासुन प्रत्यक्ष मार्कआऊट कधी दिले होते तसेच जायमोक्यावर भेट कधी दिली होती याबाबत त्यांनी चौकशी केली नाही. करारनामा झाल्यानंतर लगेच रक्कम वर्ग का झाली नाही त्याबाबत त्यांनी चौकशी केली नाही. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे

त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

**३३.** आरोपी क्र.२ यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी त्यांनी मान्य केले आहे की, पंचायत समितीला एक स्थापत्य अभियंता असतो व तो बांधकामावर देखरेख करतो. प्रस्तुत प्रकरणातील बांधकामावर कनिष्ठ अभियंता दुरुगकर देखरेख कारत होते. दिनांक ०१/०४/२०१० पासुन राज्य सरकारचा मोफत व सक्तीचे शिक्षण अधिनियम लागु झाला. त्याअन्वये शालेय व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आल्या. त्यामुळे पुर्वी तजी शालेय ग्राम शिक्षण समिती होती ती बरखास्त झाली. त्यामुळे दिनांक ०१/०४/२०१० पासुन आरोपी क्र.२ चे अधिकारी संपुष्टात आले याबाबत त्यांना माहीती नाही. दिनांक १५/०३/२०१२ रोजी आरोपी क्र.१ याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तफावत रक्कम भरुन घेणेबाबत अर्ज दिला होता. त्याप्रमाणे त्यांच्या पगारातुन तफावर रक्कम वसुल करण्यात आली किंवा कसे याबाबत त्यांना माहिती नाही. तक्रारदार धाराशिव तालुक्यातील आंबंवाडी येथील होता. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

**३४.** सदरचा साक्षीदार हा सर्व शिक्षण अभियानामध्ये कार्यरत आहे. त्यांच्या कथनाप्रमाणे त्याने जायमोक्यावर जाऊन पाहणी केली व बांधकामाचे मोजमाप पुस्तीकेनुसार मुल्यांकन केले. तसेच, ग्रामशिक्षण समितीचे पासबुक देखील तपासले. तसेच, जायमोक्यावरील बांधकामाच्या साहित्याचे देखील मुल्यांकन केले. त्यानंतर त्यांनी त्या सदंर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला. परंतु, सदरचा अहवाल अभियोग पक्षातर्फे अभिलेखावर सिध्द करण्यात आलेला नाही. त्यामुळे, सदरच्या साक्षीदाराची साक्ष केवळ तोंडी स्वरुपाची ठरते. सबब, योग्य त्या कागदोपत्री पुराव्याशिवाय सदरच्या साक्षीदाराच्या साक्षीवर पुर्णपणे विश्वास ठेवता येणार नाही.

**<u>साक्षीदार</u>**

**३५.** सा.क्र. ५, शिरीष यांच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, सन

२०१२ साली ते गटशिक्षण कार्यालय, कळंब येथे व.सहाययक लेखा या पदावर कार्यरत होतो. पोलीसांनी त्यांना पंचनामा करण्याकामी शाळेवर बोलावले होते. त्यांना तारीख सांगता येणार नाही. पोलीसांनी त्यांचे समक्ष शाळेचे रेकॉर्ड जप्त केले. त्यामध्ये खर्चाचे प्रमाणके, कॅशबुक, बॅंक पासबुक इ. जप्त केले होते. त्यानंतर पोलीसांनी पंचनामा केला होता. त्यांना तो पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. असे त्यांनी कथन केले आहे.

**३६.** आरोपी क्र.१ व तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे नकारार्थी दिलेली आहेत. आरोपी क्र.२ तर्फे आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास स्वीकारण्यात आला.

**३७.** साक्षीदार क्र.५ हे सदरच्या प्रकरणातील जप्ती पंच आहेत. सदरच्या साक्षीदाराने निशाणी क्रमांक ९६ वरील जप्ती पंचनामा हा सिध्द केलेला आहे. त्यामुळे, सदरच्या साक्षीदाराची साक्ष ही अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या इतर साक्षीदाराच्या साक्षीशी तुलना करुन विचारात घेणे न्यायोचीत ठरेल.

**<u>तपासीक अंमलदार</u>**

**३८.** सा.क्र. ६ मारुती यांच्या साक्षीत असे आले आहे की, सन २०१२ मध्ये ते पोलीस स्टेशन कळंब येथे पोलीस उपनिरिक्षक या पदावर कार्यरत होतो. गु.र.क्र ४१/२०१२ चा तपास त्यांनी केलेला आहे. त्यांना अभिलेखावरील फिर्याद नि.क्र. ११० वर दाखविण्यात आली. ती त्यांचे समक्ष नोंदविण्यात आली होती. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर पीएसओ म्हणून त्यांची सही आहे. फिर्याद दिल्यानंतर फिर्यादीने पाच ते सहा कागदपत्रे त्यांचेकडे आणून दिली होती. त्यांना वस्तु अ वरील फाईल दाखविण्यात आल्या. त्या फिर्यादीने त्यांचेकडे आणून दिल्या होत्या. त्याचे अवलोकन त्यांनी केले होते. त्यानंतर फिर्यादीने त्यांचेकडे प्रोसीडींग बुक आणून दिले होते. त्यांना त्याची छायांकित प्रत

दाखविण्यात आली. त्यास वस्तु ब देण्यात आली.

**३९.** दिनांक ०१/११/२०१२ रोजी घटनास्थळी जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ नि.क्र. १११ पंचनामा केला. त्यातील मजकूर खरा असून त्यावर त्यांची सही आहे. त्यानंतर निशाणी क्रमांक ९६ प्रमाणे जप्ती पंचनामे दोन पंचांसमक्ष केले. त्यानुसार अभिलेख जप्त केले त्यामध्ये अनुक्रमांक १. एमबी रजिस्टर, अनुक्रमांक २. किर्द रजिस्टर, ३. बांधकामाच्या खर्चाचे प्रमाणक, ४. तांत्रीक मंजूरीचे आदेश, बांधकामाचे अंदाजपत्रक, बांधकामाचे नकाशे, बांधकामाचा करारनामा, ग्रामपंचायत नमुना ८-अ, ५. मराठवाडा ग्रामीण बँक शाखा मोहा पासबुक खाते क्रमांक ३३१३, ६. महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा मोहा पासबुक खाते क्रमांक २२०००५१. बांधकामासंबंधी इतर कागदपत्रे जप्त केले. त्या दस्तांचे अवलोकन त्यांनी केले होते. त्याप्रमाणे जप्ती पंचनामा तयार केला.

**४०.** त्यानंतर उपलब्ध अभिलेखावर पुरावा निष्पन्न झाल्यामुळे आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. आरोपींनी पैसे मिळाल्यापासून सहा महिन्यांमध्ये बांधकाम पुर्ण करणेबाबत जिल्हा परिषद धाराशिव यांचेसोबत करारनामा केला होता. तपास करत असताना आरोपींनी करारनाम्याच्या अटी मुदतीमध्ये पुर्ण केल्या नाहीत. शासनाकडून आरोपींना ०६,१९,८७५/- रुपये प्राप्त झाले होते. त्या रक्कमेचा करारनाम्याच्या अटीप्रमाणे आरोपींनी वापर केला नाही. तपासांती आरोपींनी १,१२,८८१/- रुपयांचा अपहार केल्याचे त्यांना दिसून आले.

४१. आरोपी क्र.१ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, त्यांच्याकडे पोलीस निरीक्षक यांनी तपास दिला. संध्याकाळी ०८.१५ वाजता तपास त्यांच्याकडे आला. वस्तु अ फिर्यादीने फिर्यादसोबत त्यांच्याकडे आणले होते. वस्तु अ मध्ये कोणी कोणाच्या समक्ष काय लिहीले हे त्यांना त्यावेळी माहित असण्याचे कारण नाही. दुस-या दिवशी त्यांनी घटनास्थळावर पडलेल्या बांधकामाचे साहित्याचा पंचनामा केला. त्यांनी

पंचनाम्यामध्ये साहित्याचे क्वांटम नोंदविले नाही. त्यांनी फिर्यादीच्या अभिलेखावरील नोंदी घेवुन तपास केला या व्यतिरीक्त तपास केतला नाही. त्यांना गुन्हा व कराराचा भंग या दोन्हीच्या संकल्पना समजतात. करारनाम्याचा दिनांक २९/०३/२००८ असा आहे. सरकारने पहिला हप्ता दिनांक २८/०२/२००९ रोजी ४,१९,३७५/- व दुसरा हप्ता दिनांक ०९/०६/२०१० रोजी १,३०,५००/- रुपये दिला.

४२. त्यांनी पुढे असे मान्य केले आहे की, अंदाजपत्रकामध्ये दरवर्षी डी.एस.आर. दरामध्ये किती फरक पडतो हे त्यांनी तपासले नाही. शालेय शिक्षण समितीच्या सदस्यांचे तपास टिपण त्यांनी नोंदविले नाही. गुन्हा दाखल होण्यापुर्वीपासुन आरोपी क्र.१ हे खेर्डा येथे कार्यरत नव्हते. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

४३. आरोपी क्र.२ तर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, दिनांक १७/०६/२०१० रोजी बालाकांचा मोफत शिक्षणाचा कायदा अंमलात आला. त्या अधिनियमानुसार दिनांक ३०/१२/२०१० रोजी आरोपी क्र.२ यांचे पद अबॉलिश झाले तसेच, समिती देखील बरखास्त झाली याबद्दल त्यांना माहिती नाही. उर्वरीत उत्तरसुचक प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

४४. साक्षीदार क्र.६ हे सदरच्या प्रकरणातील तपासी अधिकारी आहेत. त्यांची साक्ष ही त्यांनी तपासादरम्यान राबविलेली तपास प्रक्रिया सिध्द करण्याइतपत अभियोग पक्षास उपयुक्त ठरेल. त्यांनी निशाणी क्रमांक १११ वरील घटनास्थळ पंचनामा हा सिध्द केलेला आहे. तसेच, निशाणी क्रमांक ९६ वरील जप्ती पंचनाम्यानुसार त्यांनी पंचांसमक्ष सदरच्या प्रकरणातील अभिलेख हे जप्त केले त्यामध्ये एम.बी.रजिस्टर, किर्द रजिस्टर, बांधकामाच्या खर्चाचे प्रमाणक, तांत्रिक मंजुरीचे आदेश, बांधकामाचे अंदाजपत्रक, बांधकामाचे नकाशे, बांधकामाचा करारनामा, ग्रामपंचायत नमुना क्रमांक ८/अ, मराठवाडा ग्रामीण बँकचे पासबुक

इत्यादी कागदपत्रे जप्त केली. परंतु, याठिकाणी नमुद करणे आवश्यक वाटते की, वरील जप्त कागदपत्रे अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायद्याच्या तरतुदींच्या अधीन राहुन सिध्द करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे, केवळ ते तपासी अधिकारी यांनी क्रमांक ९६ वरील जप्ती पंचनाम्यामध्ये जप्त केले म्हणुन अभियोग पक्षास उपयुक्त ठरणार नाहीत. सबब, सदरच्या साक्षीदाराची साक्ष निशाणी क्रमांक ९६ वरील पंचनाम्यामधील कागदोपत्री पुरावा सिध्द करण्यास उपयुक्त ठरणार नाही.

४५. अभिलेखावरील एकंदरीत सादर करण्यात आलेल्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, साक्षीदार क्र.१ यांनी अभिलेखावरील फिर्याद सिध्द केलेली आहे. तसेच, साक्षीदार क्र.२ यांनी अभियोग पक्षास समर्थन दर्शविलेले नसले तरी साक्षीदार क्र.६ यांनी निशाणी क्रमांक ११ वरील घटनास्थळ पंचनामा सिध्द केलेला आहे. साक्षीदार क्र.३ यांनी जायमोक्यावर जाऊन बांधकामाचे मुल्यांकन करुन सदरचा अहवाल सादर केला. परंतु, तो अहवाल अभिलेखावर सिध्द केल्याचे दिसुन येत नाही. साक्षीदार क्र.४ यांनी देखील तथाकथित करारनामा, मुल्यांकन अहवाल व जायमोक्यावर पडलेल्या बांधकामाचे मुल्यांकन, ग्रामशिक्षण समितीचे पासबुक याबद्दल ऊहापोह केला आहे. परंतु, त्यासदर्भातील अहवाल अभियोग पक्षातर्फे सिध्द करण्यात आलेले नाहीत. एकंदरीत, अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, अभियोग पक्षाचा खटला हा पुर्णपणे तोंडी पुराव्यावरती अवलंबुन असल्याचे दिसुन येते. सदरच्या प्रकरणात अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांनी कथन केलेले कागदोपत्री पुरावे सिध्द करणे अपेक्षीत होते. त्यामुळे निशाणी क्रमांक ५२ नुसार निर्धारीत केलेले दोषारोप हे केवळ अभिलेखावरील तोंडी पुराव्यावरती अवलंबुन राहुन संशयापलीकडे सिध्द झाले असे म्हणता येणार नाही. म्हणुन दिनांक २८/०२/२००९ ते ०१/०६/२०११ या कालावधीमध्ये आरोपी क्र.१ व २ यांनी रक्कम रु.१,१२,८८१/- चा अपहार केला ही बाब अभियोग पक्षाने संशयापलीकडे जाऊन सिध्द केली नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ बाबतः-</u>**

**४६.** मुद्दा क्र. १ च्या निष्कर्ष प्राप्तीनुसार भा.दं.वि. चे कलम ४०९ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराध आरोपींविरुध्द संशयापीकडे जाऊन सिध्द करण्यास अभियोग पक्ष पुर्णपणे अपयशी ठरला आहे. वरील सर्व परिस्थितीचा विचार करीता माझ्या मते आरोपीं हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परिणामी मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१.** आरोपी क्र.१. अजित चंद्रकांत बाभळे आणि २. मिनाक्षी विनायकराव लोकरे यांची भा.दं.वि. कलम ४०९ सह ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधांमधून फौ.प्र.सं. कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींचा वैयक्तीक जातमुचलका व जामीनकतबा रद्द करण्यात येतो.

**३.** निशाणी क्रमांक २ अन्वये गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा अपील कालावधी संपुष्टात आल्यानंतर संबंधीत कार्यालयास नियमाप्रमाणे पाठविण्यात यावा.

**४.** फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७-अ च्या पुर्ततेकामी आरोपींनी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चा जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

NITIN MAHADEO REDDY

Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.07.06 17:52:38 +0530

दिनांक : ०६/०७/२०२६
ठिकाण : कळंब

**(एन. एम. रेड्डी)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
(कोर्ट नं.२) कळंब.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | -- | Shri. Prashant Sunita S. Ovhal, Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | -- | In the Court of 2nd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C. Kallam. |
| Date of dictation | -- | 06/07/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 06/07/2026. |
| Order uploaded on | -- | 06/07/2026. |